# प्रेसनोट दि.२१/०७/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन वेश्याव्यवसाय करणा-या मसाज पार्लरवर ठिकाणी छापा कारवाई

दि.२०.०७.२०१७ रोजी गुन्हे शाखेकडील गोपनीय माहीती नुसार हेअर ॲन्ड स्पा, युनिसेक्स मसाज सेंटर , शिवनेरी कॉलनी प्लॉट नं.५ बाणेर पुणे येथे मसाज सेंटरच्या नावाखाली अवैध्य वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहीती मिळाले वरुन गुन्हे शाखेच्या पथकाकडुन पडताळणीद्वारे छापा कारवाई करण्यात आली.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी नमुद मसाज पार्लर येथे चालत असलेल्या वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकुन १ सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन मसाज सेंटर मालकीन नामे मोहीनी अर्जुन दोडके वय २७ वर्ष रा. शिवनेरी कॉलनी प्लॉट नं. ५ बाणेर पुणे व अर्जुन शिवदास दोडके वय २७ रा.सदर यांना ताब्यात घेतले. या गुन्ह्यामध्ये यातील पिडीत मुलगी ही नोकरीच्या निमित्ताने पुणे शहरात आलेली होती. परंतु नोकरी न मिळाल्याने व घरची परिस्थिती गरिबीची असल्याने यातील आरोपीतांनी याचा फायदा घेवुन सदर मुलीस मसाज पार्लरमध्ये नोकरीच्या नावाखाली वेश्याव्यवसायामध्ये ओढल्याचे दिसुन आले आहे. या अनुषंगाने चतुश्रृगी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ३९८/२०१७ ईटपा कायदा कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि संपत पवार, संजय गिरमे, रमेश लोहकरे, नितिन तेलंगे, सतिश ढोले, राजेश उंबरे, राजेद्र कचरे, गितांजली जाधव, सरस्वती कागणे,सचिन शिंदे तसेच चतुश्रृगी पोलीस स्टेशन कडील वपोनि ढोमे व महिला पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गलांडे तसेच स्टाफ यांनी केलेली आहे.